# जागतिक रेडिओ दिन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

"नमस्कार श्रोतेहो.... हे आकाशवाणीचे पुणे केंद्र आहे. सकाळचे पाच वाजून सत्तावन्न मिनिटे आणि बारा सेकंद झाले आहेत. आपल्या आजच्या सभेला सुरुवात करु या मंगलध्वनीने.... आणि मग तो मंगलध्वनी सुरु व्हायचा. अगदी लहानपणी पासून दिवसाची सुरूवात अशीच होते. आणि दर पाच मिनिटांनी बदलणारे कार्यक्रम वेळ सांगतात. सकाळच्या घाईत घड्याळ बघावे लागत नाही. ते काम रेडिओ ऐकला की आपोआप होते. शिवाय ते कार्यक्रम ज्ञानात भर घालतात हा खूप मोठा आणि महत्वाचा फायदा! आजही मला लहानपणी निवेदन करणारे निवेदक व त्यांचे निवेदन आठवते. सुधा नरवणे प्रादेशिक बातम्या द्यायला आल्या की शाळा कॉलेजला निघायची योग्य वेळ झाली हे लक्षात यायचे. आणि त्या बातम्या संपल्या की उशीर झाला असे समजायचे.

सकाळी सकाळी रेडिओ लावायची जुनी सवय बऱ्याच जुन्या आठवणी जाग्या करते. आज गाणे ऐकले "शब्द शब्द जपून ठेव" एकीकडे काम चालू होते. आणि इतके अर्थपूर्ण गाणे ऐकत असताना माझ्या मनात कसे विचार येतात याचे हसू आले. आणि जपून ठेवलेल्या वस्तू आठवायला लागल्या. आणि कुठे कुठे जीव अडकतो याची गंमत वाटली.

परवा सहज कपाट आवरताना जरा पिवळसर पडलेली कॅरीबॅग सापडली. उघडून बघितले तर "रेडिओचे लायसन" सापडले. आता असे वाटेल हा काय प्रकार आहे? पण पूर्वी (मी लहान असताना) रेडिओसाठी परवाना आवश्यक होता. एका वर्षा साठी १/२ रुपये पोस्टात भरून त्या पुस्तकावर तिकीट लावून आणावे लागायचे. आणि घरात टेबल सारखे मोठे रेडिओ असायचे तो नीट ऐकण्यासाठी ३/४ फूट लांबीची व २/३ इंचाची तांब्याची जाळी असलेली पट्टी घरात लावावी लागायची. आणि छोटा रेडिओ ( ट्रांझिस्टर ) सायकलच्या हॅण्डलला लावून लोक ऐटीत फिरायचे. आणि ज्याच्याकडे लायसन नसेल तो लपवून ट्रांझिस्टर नेत असे.

हे सर्वच रेडिओ मात्र नवनवीन कपडे घालायचे. त्यात गृहिणीची कलाकुसर व दृष्टी याची जणू परीक्षा व्हायची. काही जणी तर त्यावर स्वहस्ते भरतकाम करायच्या आणि कौतुक मिळवायच्या.

आमच्या कडे मोठ्ठा रेडिओ होता. लांबून बघितले तर पुस्तकांचे कपाट वाटावे असा होता. मी कायम त्याच्या बटणावर पाय ठेवून वर चढून दूध प्यायला बसायची. मग जेवायला बसायची. ही बाल सवय त्याचा उपयोग कळायला लागल्यावर सुटली.

विशेष म्हणजे या रेडिओचे सर्वत्र दर्शन होते.शेतात, मळ्यात, चौकात, पारावर,



बागेत कुठेही सूर ऐकू येतात. मधल्या काही काळात असे भय वाटत होते की सगळ्या आधुनिक साधनांच्या गदारोळात आपला रेडिओ लुप्त होईल का? पण रेडिओने आपले स्थान कायम ठेवले आहे. स्वरूप बदलले आहे. सुटसुटीत झाले आहे. पूर्वीच्या अडचणी (रेडिओ वापरातील) आता नाहीत. त्याने प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये स्थान मिळवले आहे. आणि पेन सारखे छोटे स्वरूपही धारण केले आहे. आणि आता ऐकू येणारी स्टेशन्स सुद्धा वाढली आहेत.

काही वर्षांपूर्वी प्रसारित होणारे कार्यक्रम आधुनिक स्वरूप धारण करून पुन्हा प्रसारित होऊ लागले आहेत. या रेडिओच्या अनंत आठवणी बऱ्याच जणांच्या मनात जागृत असतील.

रेडिओवर एक जाहिरात लागते. एक सखी दुसरीला विचारते, "कुटं ग शिकलिस एवढं ग्यान?" लगेच दुसरी उत्तरते, "आपल्या रेडिओनं श्यानं केलंय की, तू बी ऐकत जा." हे ऐकून अगदी पटले. खरेच जे नियमित रेडिओ ऐकतात त्यांचे मन विविध माहिती, ज्ञान, आरोग्य, गृहिणींना मार्गदर्शन, मनोरंजन, यांनी भरून जाते. आणि या साठी वेगळा वेळ द्यावा लागत नाही. शिवाय डोळेही बिघडत नाहीत.

या रेडिओची सुरुवात भारतात १९२३ साली झाली. पण ती खाजगी कंपनी होती. आणि ती दिवाळखोरीत निघाली. नंतर १९३६ मध्ये ही कंपनी सरकारने ताब्यात घेतली आणि "ऑल इंडिया रेडिओ" असे नामकरण केले.

प्रासंगिक कार्यक्रम सादर करणे. हे तर रेडिओचे खास वैशिष्ट्य आहे. रेडिओवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांवर लिहायचे म्हंटले तर एक वेगळाच लेख होईल. आज जागतिक रेडिओ दिनाच्या निमित्ताने भारतातील रेडिओ विषयी काही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय खूप मोठा आहे. जे माझ्या सारखे रेडिओ प्रेमी आहेत त्यांना नक्कीच असे वाटते, हा रेडिओ अजरामर होवो. जागतिक रेडिओ दिनाच्या शुभेच्छा!



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

# माझा प्रिय रेडिओ

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नमस्कार श्रोतेहो... हे आकाशवाणीचे औरंगाबाद केंद्र आहे..." सकाळचे पाच वाजून ५७ मिनिटे आणि १२ सेकंद झाले आहेत... आता आपण आजच्या सभेला सुरुवात करूया मंगलध्वनीने...

माझ्या दैनंदिन जीवनाची सुरुवात 'रेडिओच्या आवाजानेच" होते. खरं तर, लहानपणापासूनच माझ्या आईमुळे मला रेडिओ ऐकण्याची सवय लागली. आईच्या दिवसाची सुरुवात रेडिओशिवाय होत नाही, आणि तिच्यामुळेच मला देखील रेडिओचे प्रेम जडले. रेडिओने माझ्या आयुष्यावर कळत-नकळत संस्कार केले आहेत, आणि त्याचेच फळ म्हणजे माझ्या जगण्यातील आनंदी क्षण !

आजही माझ्या दिवसाची सुरुवात रेडिओच्या सूरांनी होते. किचनमध्ये काम करताना, चहा-नाश्ता बनवताना रेडिओची साथ असतेच. त्याच्या कार्यक्रम ऐकण्यात मी इतकी गुंग असते की माझा स्वयंपाक कधी पूर्ण होतो ते मलाही कळतही नाही. ऑफिसला निघायच्या वेळी मात्र मी मोठ्या जड अंतःकरणाने रेडिओ बंद करते.

लहानपणी रेडिओ ऐकताना मला नेहमी वाटायचं की मीही एक दिवस आकाशवाणीवर बोलेन. त्या इच्छेपोटी प्रयत्न केले, आणि आज अभिमानाने सांगू शकते की, औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावर माझे अनेक कार्यक्रम झाले आहेत ! "यशाच्या पाऊलखुणा," "सखी संपदा," "हॅलो सई," आणि कितीतरी साहित्यिक, सांस्कृतिक, व सामाजिक विषयांवरील चर्चासत्रांत मी सहभाग घेतला. रेडिओवर माझा आवाज ऐकण्याचा मला होणारा आनंद मला आज येथे शब्दांत मांडता येणार नाही. माझ्या कार्यक्रमांबद्दल जेव्हा श्रोत्यांच्या प्रतिक्रिया येतात, तेव्हा मला खूप समाधान वाटतं. त्याबद्दल मी रेडिओची खुप खूप आभारी आहे.



आजच्या डिजिटल युगात मोबाईल, पीसी, लॅपटॉप यामध्ये हजारो गाणी, पॉडकास्ट्स आणि मनोरंजनाची साधने उपलब्ध आहेत. पण रेडिओवरील कार्यक्रमांची मजा काही औरच असते. त्या सुरेल आवाजांची, निवेदकांच्या खास शैलीची जादू वेगळीच आहे.

रेडिओशी जुळलेलं माझं हे नातं "मरते दम तक उतरेगा नहीं"! रेडिओ हा माझा सच्चा मित्र तर आकाशवाणी केंद्र माझ्यासाठी जणू जीवाभावाची मैत्रीण बनली आहे.

"रेडिओची खंत"

आज मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात रेडिओ हळूहळू कालबाह्य होत चालला आहे. एकेकाळी मनोरंजनाचे एकमेव साधन असलेला रेडिओ पूर्वी घराघरांत, गावागावांत असायचा. शेतकरी, गुरे राखणारे गडी, घरकाम करणाऱ्या स्त्रिया प्रत्येकाच्या आयुष्याचा एक भाग होता. परंतु आता तो मागे पडत चालला आहे.

पण मला खात्री आहे की, जर तुम्ही पुन्हा रेडिओशी नाते जुळवलं, तर जुन्या आठवणी नक्कीच दाटून येतील. मनाच्या एखाद्या कोपऱ्यात दडलेल्या भावनांना जागं करण्यासाठी पुन्हा एकदा रेडिओ ऐकून पहा.

रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. १९४५ मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. स्पेन रेडिओ अकादमीने २०१० मध्ये जागतिक रेडिओ दिवस साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७ व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने १४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

तर मग, मित्रमैत्रिणींनो, करणार ना तुम्हीही रेडिओशी परत मैत्री?

**(तुम्हाला माझा लेख कसा वाटला, नक्की प्रतिक्रिया द्या! मी तुमच्या प्रतिसादाची वाट पाहत आहे.)**



शब्दांकन
(सीमा गाडेकर)
उपकार्यकारी अभियंता,
महापारेषण, छत्रपती संभाजीनगर
९४२३१७२३०५



## ४३वे ग्रामीण साहित्य संमेलन, विटा येथे संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी विटा येथे ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित केले होते.गेली बेचाळीस वर्षे विटा जि.सांगली येथे हे संमेलन आयोजित केले जाते. हे संमेलन प्रसिद्ध साहित्यिक व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध लेखक मुरहरि केळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.ह्या संमेलनाचे आयोजक राधा रामकृष्ण बापट वाचनालय यांच्या वतीने घेण्यात येते. आज पर्यंत झालेल्या संमेलनात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिकांनी संमेलनाध्यक्ष म्हणून हजेरी लावली आहे.सकाळच्या सत्रात उद्घाटन कार्यक्रमा सह महाराष्ट्रातील काही साहित्यकांचा गौरव करण्यात आला. या उद्घाटन कार्यक्रमा नंतर कवीसंमेलन झाले. अनेक कवींनी एक एक कविता सादर केल्या.काही बालकवींनी ही कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने सोलापूरचे लेखक कवी गोविंद काळे व पंढरपूरचे साहित्यिक दत्ता तरलगट्टी यांनी अहिल्याबाईची कविता सादर केल्या. या सत्रात कवी आनंदहरी हे कवीसंमेलनसाठी अध्यक्ष होते.दुपारच्या सत्रात मुख्य व्याख्याने होती. सायंकाळी सिध्देश्वर सपकाळ,विश्वनाथ गायकवाड, नागू विरकर,संजय आवटे यांचे कथाकथन आयोजित केले होते. एक दिवसाच्या या संमेलनाचे उपस्थित रसिक श्रोत्यांकडून कौतुक होत होते. या वाचनालयाचे मा.रघुराज मेटकरी, मा.अरुण लंगोटे,मा. सौ.वैशाली कोळेकर यांचे व सहकार्यांचे उत्तम नियोजन होते.

# मुले म्हणजे मार्क्स देणारे मशीन नव्हे .....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत शाळा,अभ्यास, परीक्षा ट्युशन, होमवर्क अशा चक्रव्यूहात आजची मुले अडकली आहेत.त्यांना रोज प्रचंड अशा ताणतणावाला सोमोरे जावे लागतय.याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे बीड जिल्ह्यातील एका विद्यार्थीनीचा अतिताणातून हदयविकाराच्या तीव्र झटक्याने वर्गात झालेला मृत्यू होय. समस्त पालक वर्गाला प्रचंड मोठा धक्का देणारी ही घटना आहे.

मुले आणि त्यांचे शिक्षण आज आपण कोणत्या मार्गाने घेऊन चाललो आहोत ? याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. ताणतणावाला सामोरे कसे जायचे हे मुलांना आपण शिकवतो का? शाळेतील त्यांची शैक्षणिक प्रगती यावर पालक म्हणून आपले समाधान होते का? हा खरा प्रश्न आहे.

सकाळी उठले की शाळा .शाळेतून आले की खाजगी क्लास .क्लासवरुन घरी आले की शाळेचा आणि क्लासचा होमवर्क तोही मध्यरात्रीपर्यंत. मुलांनी झोपायचे कधी.? त्यांना विश्रांती नको का ? त्यांनाही मेंदू आहे. तोही थकत असेल .त्यांनाही कंटाळा येत असेल.पालक म्हणून आपण त्यांना समजून कधी घेणार आहोत की नाही ?

मुले म्हणजे मार्कस मिळवून देणारे मशीन नव्हे . हे आपल्याला कधी समजणार ? अशा अनेक मुलांचा जीव गेल्यावर ?

खरं तर मुले हीच आपली संपत्ती आहे.तेच आपले सर्वस्व आहे.त्यांना असे गमावून कसे चालेल ?

मान्य आहे आजच्या काळात शिक्षणाला कमालीचे महत्त्व आले आहे.शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मेहनत घेतल्याशिवाय मुलांचे स्वप्न पूर्ण शकत नाही. करिअर होऊ शकत नाही. हे सगळं जरी खरं असले तरी अतिताणतणावाने मुलांना आपल्यातून जाऊ देणे कितपत योग्य आहे ?

प्रत्येक मुलाला जन्मतःच काही नैसर्गिक क्षमता मिळालेल्या असतात. त्याचा कल आवड आणि क्षमता पाहून त्याला शिकण्यास प्रोत्साहन देणे हे पालक, शाळा आणि शिक्षकांचे काम असते. शिक्षण घेत असताना मुलांवर अतिताणतणाव येणार नाही. मुक्त वातावरणात हसत खेळत शिक्षणाचा आनंद घेता यायला हवा. तरच त्याची शिक्षणातील रुची वाढेल. त्याच्या अंगी असणाऱ्या नैसर्गिक क्षमतांना पुरेपूर वापरुन हाती येणारे यश यावर पालक म्हणून आपण निश्चित समाधानी व आनंदी रहायला हवे.



**विद्यार्थ्यांशी हितगुज**

लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

आपल्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचे माध्यम म्हणून आपण मुलांचा वापर करतो. म्हणून त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादले जाते.

दुसऱ्या मुलांशी तुलना केली जाते. पाल्य मागे या जगात मागे राहतो काय अशी भीती पालकांना सतावत राहते. त्या भितीतून पालकांवर ताण येतो.तो ताण मुलांवर टाकला जातो. त्यामुळे मुले तणावाखाली वावरतात.त्यांना धड बोलण्याचे स्वातंत्र्य नसते. करिअरसाठी तुला मेहनत करावी लागेल हेही सतत ऐकावे लागते.

प्रत्येक मूल हे वेगळे असल्याने प्रत्येकाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे एकमेकांची तुलना करणे गैर ठरते. तसेच मुलांकडून अवास्तव अपेक्षा ठेवण्याचा विचारही चुकीचा असतो. खरं तर त्यांच्या समजून घेणे आणि त्यांना विश्वास देणे गरजेचे असते. मुलांच्या अंगभूत क्षमतानुसार त्यांना शिकू देणे. त्यांना प्रोत्साहन देणे एवढेच पालकांचे काम असते.आणि अपयश आल्यावर खंबीरपणे पाठीशी उभे राहणे. त्यामुळे मुलांना आत्मविश्वास येतो.माझे पालक माझ्या पाठीशी आहेत.या आनंदाने मुलांना नवचैतन्य आणि ऊर्जा मिळते.त्यांची शैक्षणिक प्रगती भरारी घेत राहते. आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559